# हॉलंडच जग प्रसिद्ध ट्युलिप गार्डन !



इंग्लंडहून रात्री निघालेली क्रूज हुक ऑफ हॉलंड च्या पोर्ट मध्ये येऊन थांबली. इमिग्रेशनचे सोपस्कार आटपून अमित आणि मैत्रेयी वेटिंग हॉलमध्ये आले. बाहेर आलेल्या ट्रॉली मध्ये त्यांच्या बॅग्ज आल्या होत्या. पोर्टच्या पार्किंग एरियामध्ये एक मिनी व्हॅन उभी होती. आजूबाजूला दोन-तीन बसेसही थांबल्या होत्या.त्यांच्या नावाची पाटी हातात धरून उंच धिप्पाड हन्स उभा होता. आपल्या बॅग सांभाळत दोघेही हन्सला भेटले. हन्स त्यांचा ड्रायव्हर कम गाईड होता. पुढच्या पाच मिनिटात त्या दोघांना घेऊन हन्स पोर्टमधून निघाला. हॉलंडसारखा सुंदर देश...लग्नानंतर पहिल्यांदाच फिरायला निघालेल्या अमित आणि मैत्रेयी साठी युरोपची टूर ही एक फेअरी टेलच होती.

हॉलंडच्या सुंदर रस्त्यावरून त्यांची गाडी लिजे या गावाच्या दिशेने जात होती.मधून मधून हंस हॉलंड बद्दल माहिती पुरवत होता. "आजचा आपला पहिला स्टॉप आहे क्यूकनहॉफ ट्युलिप गार्डन चा. याला गार्डन ऑफ युरोप असंही म्हणतात. ३२ हेक्टर एवढ्या क्षेत्रफळामध्ये ट्युलिपचे अंदाजे ७० लाख फ्लॉवर बल्ब रुजवले जातात. ट्युलिपबरोबरच गुलाब,डॅफोडील,लॅवेंडर इत्यादी फुलांचं मोहक प्रदर्शन, तुम्हाला इथे बघायला मिळतं. तसंच, पांढऱ्या गुलाबी रंगाची

# हॉलंडच जग प्रसिद्ध ट्युलिप गार्डन !

चेरीची अनेक झाडे पण इथे दिसतील. लाल, पिवळ्या, निळ्या अशा विविधरंगी फुलांच्या ताटव्यांच्या बाजूने, आखीव रेखीव रस्ते काढलेले आहेत. या रस्त्यांची लांबी साधारण 18 किलोमीटर एवढी भरते. इथे, हॉलंड ह्या चिमुकल्या देशाचं वैशिष्ट्य दाखवणारे कालवे तुम्हाला दिसतील, तसंच नितळ पाण्याचा एक सुंदर तलाव सुद्धा.

त्याच्या आजूबाजूलाही तुम्हाला भरपूर फुले पाहायला मिळतील.पण सर्वात सुंदर देखावा तुम्हाला पाहायचा असेल, तर या गार्डनमध्ये एक जुन्या काळची पवनचक्की आहे.त्यावरून तुम्ही पहाल तर तुम्हाला दिसतिल लांबच लांब पसरलेले ट्युलिपचे ताटवे. जणू काही जमिनीवर पसरलेला, रंगीबिरंगी गालिचाच तो. तुम्ही पाहिलेल्या सिलसिला पिक्चरच्या, गाण्याचं शूटिंगही इथेच झालंय..तसा आमचा हॉलंड फुलांच्या निर्यातीत अग्रेसर आहे.पण गम्मत माहित आहे का ? ट्युलिपचे हे सुंदर फूल मुळात टर्की या देशातून इथे आलेलं आहे..तेही सोळाव्या शतकात. टर्कीच्या सुलतानाकडून रोमन सम्राट फर्डिनांडला या फुलांचे बल्ब भेट म्हणून आलेले होते.ही भेट विएन्ना,बेल्जियममधून ॲम्स्टरडॅमला पोचली. हॉलंडची हवा आणि जमीन या फुलांना मानवल्यामुळे ट्युलिपची लागवड खूप मोठ्या प्रमाणात इथे सुरू झाली.तत्कालिन युरोपियन फुलांपेक्षा ट्युलिप खूप वेगळे असल्याने, ते फार लोकप्रिय झाले ".एवढे बोलून हन्स म्हणाला " आता आपण ट्युलीप गार्डन ला पोचलो आहोत. "

हन्सच्या गप्पांमधे, गार्डनला येईपर्यंतचा वेळ मोठा छान गेला. "ही तुमची तिकीट्स आणि आत मध्ये स्ट्रॉबेरी विथ क्रीम खायला विसरू नका." अशी प्रेमाची टीप हन्सने दिली. पुढचे दोन तीन तास अमित आणि मैत्रेयी ट्यूलिप गार्डन मध्ये डोळे भरून, फूलं पाहत, मनसोक्त भटकत होते. परत आल्यावर मात्र, आठवणीने हन्सच्या हातात स्ट्रॉबेरी विथ क्रीम ठेवताना त्यांनी विचारलं...आता पुढचा स्टॉप ? आणि हातातली स्ट्रॉबेरी त्या क्रिम मध्ये घोळवून तोंडात टाकत, हंस म्हणाला, चलो....पुढचा स्टॉप...ॲम्स्टरडॅम!........... क्रमश :